# प्रारुप

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## (महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. च्या मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या प्रारुप वितरण परवान्याच्या विशिष्ट ) विनियम, २०१३

**विद्युत अधिनियम, २००३**

क्र.मविनिआ/परवाना अटी/एमएडीसी/ : विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) ने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालील विनियम करीत आहे :

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. (एमएडीसी) च्या मिहान विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१३" असे म्हणावे.

२) हे विनियम भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र शाखा), उद्योग भवन, नवी दिल्ली, यांनी दि. २९ मे, २००७, २४ जानेवारी, २००८ आणि २७ जुलै, २००९ रोजी एस.ओ. ५१४ (इ) अन्वये निर्गमित केलेल्या खालील अधिसूचनांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांसाठी लागू राहतील:

| अनु. क्र. | भारत सरकारच्या अधिसूचनेचा संदर्भ क्र. | अधिसूचनेचा दिनांक | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|
| १ | एस. ओ.८४५ (इ) | २९, मे २००७ | १५११.५१ |
| २ | एस.ओ.१४४ (इ) | २४,जानेवारी २००८ | ६६.९० |
| ३ | एस. ओ.१८४२ (इ) | २७, जुलै २००९ | १८.७५ |
| | **एकूण** | | **१५९७.१६** |

३) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात राहतील.

**२ व्याख्या :** या विनियमात, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

ए. “अधिनियम” म्हणजे विद्युत अधिनियम, २००३;

बी. “विकासक” चा अर्थ, वेळोवेळी अंमलात असल्याप्रमाणे, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत व्याख्या केल्याप्रमाणे राहील.

सी. “मानीव वितरण परवानाधारक” म्हणजे - ‘विकासक’ म्हणजेच मे. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट लिमिटेड (एमएडीसी) ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च, २०१० च्या अधिसूचना क्र. एसओ ५२८ (इ) द्वारा अधिनियमाच्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, SEZ अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता म्हणून प्राधिकृत केले आहे असा परवानाधारक.

डी. “सर्वसाधारण अटी” म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्वसाधारण अटी;

इ. “एसईझेड अधिनियम” म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (अधिनियम २००५ चा २८)

एफ. “विशेष आर्थिक क्षेत्र” किंवा “एसईझेड” म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियमाच्या कलम ३ च्या उप-कलम (४) चे परंतुक आणि कलम ४ चे उप-कलम (१) (मुक्त व्यापार आणि वखार क्षेत्रासह) आणि विद्यमान विशेष आर्थिक क्षेत्रासह, अधिसूचित असलेले प्रत्येक विशेष आर्थिक क्षेत्र.

या विनियमांत वापरलेल्या आणि ज्याच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा सर्व शब्द आणि उक्तींना विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार अर्थ राहील.

## ३ लागू करणे

आयोगाने अधिसूचित केलेल्या एमएडीसी च्या वीज वितरण संदर्भातील या विशिष्ट अटी आणि परवान्याच्या सर्वसाधारण अटी एमएडीसीच्या परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये वीज वितरणाच्या संचालनाचे व विजेच्या किरकोळ विक्रीचे नियमन करतील.

## ४ वितरणाचे क्षेत्र किंवा पुरवठ्याचे क्षेत्र

**४.१** मानीव वितरण परवानाधारकास विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत केलेले क्षेत्र हे वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकारने, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या उप-कलम (१) अंतर्गत निर्गमित केलेल्या, विशेष आर्थिक क्षेत्र अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि अपवाद यांच्या अधीन राहून, संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र खालील तक्त्यात संक्षिप्तपणे दिले आहे:-

| **अनु.क्र.** | **भारत सरकारच्या अधिसूचनेचा संदर्भ क्र.** | **अधिसूचनेचा दिनांक** | **क्षेत्र (हेक्टरमध्ये)** |
|---|---|---|---|
| १ | एस. ओ.८४५ (इ) | २९, मे २००७ | १५११.५१ |
| २ | एस.ओ.१४४ (इ) | २४,जानेवारी २००८ | ६६.९० |
| ३ | एस. ओ.१८४२ (इ) | २७, जुलै २००९ | १८.७५ |
| | एकूण | | १५९७.१६ |

सदर क्षेत्र पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशामध्ये अधिक तपशिलासह आरेखित करण्यात आले आहे आणि ते मानीव वितरण परवानाधारकाने आयोगाकडे सादर केले आहे.

**४.२** अधिनियमातील तरतुदींनुसार जनतेला सर्व उद्देशांसाठी विजेचा पुरवठा करण्याकरिता मानीव वितरण परवानाधारकाला प्राधिकृत करण्यात आले आहे.

## ५. अधिनियमाखाली परवान्याची मुदत

सदर परवाना, येथील विनियम १.२ मध्ये संदर्भित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकारने निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या दिनांकापासून २५ वर्षाच्या कालावधीकरिता अंमलात राहील.

## ६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी

या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकानंतर किंवा लगेच त्यानंतर वितरण परवानाधारक त्याच्या विशिष्ट अटी व परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहणीकरिता उपलब्ध करुन देईल.

## ७ दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतुदीमध्ये दुरुस्ती करता येईल. या विनियमात केलेले कोणतेही बदल त्यासंबंधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू राहतील आणि ते बदल त्यानंतर त्यांच्या बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहतील किंवा राहणार नाहीत, जसे असेल तसे, तथापि, हे बदल अंमलात आणत असताना, यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेला, अशा बदलामुळे किंवा रद्द करण्यामुळे, बाधा येणार नाही.

## ८ अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम आणि विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

------------------

सचिव

महाराष्ट्र विद्युत नियाक आयोग

मुंबई,

दिनांक : -------------, २०१३.